ISSN 2394-5303

GOLDEN JUBILEE YEAR
1967-2017
१९६६-२०१६
सुवर्ण महोत्सवी वर्ष

Shri Balaji Sansthan, Deulgaon Raja's

## Shri Vyankatesh Arts, Commerce & Science College

Deulgaon Raja, Dist. Buldana (M.S.), PIN- 443204.

NAAC RE-ACCREDITED AT 'B' LEVEL

Printing Area UGC Jr.No.43053 UGC Approved Refereed Journal

Special Issue, December 2017

Printing Area (TM)

International Multilingual Research Journal

IMPACT FACTOR 4.002 iijif



# Changing Trends & Issues in Indian Politics

(Volume : I)

Chief Editor:
Dr. Anant Madan Awati



Scanned by CamScanner

ISSN: 2394 5303 | Impact Factor 4.002(IIJIF) | Printing Area™ International Research journal | December 2017 Special Issue/01 | 01

आंतरराष्ट्रीय बहुभाषिक शोध पत्रिका

# प्रिंटिंग एरिया

Printing Area International Interdisciplinary Research Journal in Marathi, Hindi & English Languages

December 2017, Special Issue

Shri Balaji Sansthan Deulgaon Raja's

## Shri Vyankatesh Arts, Commerce and Science College,

Deulgaon Raja, Dist. Buldana (M.S.) Pin :443204

NAAC RE-ACCREDITED AT 'B' LEVEL

# Changing Trends & Issues in Indian Politics

(Volume : 1)

Chief Editor:

**Dr. Anant Madan Awati,**

Assistant Professor & Head, Dept. of Political Science,

Shri Vyankatesh Arts, Commerce and Science College,

Deulgaon Raja, Dist. Buldana (M.S.) Pin :443204

Moblie : 9421395187/9545195875

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205

Harshwardhan Publication Pvt.Ltd.

At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed

Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295

harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com

All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

Scanned by CamScanner

14)भारतीय राजनीति में साम्प्रदायिता : समस्या एवं निदान || 52
प्रा. पोटभरे एस. डी, जि.औरंगाबाद

15)"भारत के बदलते राजनिती में जनलोकपाल विधेयक और आम आदमी पार्टीका ... || 54
प्रा.छोटू नकुल मावची, प्रा.डॉ.विजय एस. तुंदे, अमलनेर.

16)हिंदी साहित्य में दिल्ली सरकार || 57
प्रा.वसावे मुरलीधर बी, अमलनेर,

17)'भाषावाद एवं भारतीय राजनीति' || 60
डॉ. सोनू जेसवानी,नागपुर

18)भारतातील भाषा आणि राजकारण || 63
प्रा.डॉ.मानवते उत्तम हुसनाजी, जि.नांदेड

19)भारतीय राजकारणासमोरील जातीवादाची समस्या || 66
प्रा.डॉ.संजय गव्हाणे, जि.औरंगाबाद.

20)भारतीय राजकारणासमोरील समस्या: जातीयवाद, संप्रदायवाद... || 69
डॉ. दिनेश रा. हंगे, जि. जालना.

21)धर्म व जातीचा भारतीय राजकारणावर पडलेला प्रभाव || 71
प्रा.डॉ.राहुल पंडित,जि. पुणे

22)भारतीय राजकारणासमोरील समस्या-जातीयवाद,संप्रदाय... || 74
प्रा.गौतम कांबळे,वाळूज

23)भारतीय राजकारणासमोरील समस्या (जातीवाद, संप्रदायवाद, ... || 75
प्रा.निहाळ रामदास बाबाजी,जि.जालना

24)जमातवाद : भारतीय राजकारणासमोरील एक समस्या || 79
प्रा.लक्ष्मण एफ. शिराळे, बुलडाणा.

25)भारतीय राजकारणासमोरील प्रादेशिकवादाची समस्या || 83
प्रा.नागेश गायकवाड,जि.बुलडाणा

26)भारतीय राजकारणातील समस्या—जातीवाद,धार्मिकता आणि ... || 86
प्रा.कल्पना एस.गोडघाटे,यवतमाळ

27)भारतीय राजकारणातील प्रमुख आव्हाने || 92
प्रा.डॉ.संतोष सदाशिवराव मिसाळ, अकोला

http://www.vidyawarta.blogspot.com — https://sites.google.com/site/vidyawartajournal



Scanned by CamScanner

सर्वांनी सर्वप्रथम साक्षर होउन संघठीत होउन राष्ट्रउभारणी करिता संघर्ष करण्याची तयारी ठेवली पाहिजे.

**भाषावाद :—**

आज भारतामध्ये २९ राज्ये व ७ केंद्रशासित प्रदेश आहेत. मात्र असे असले तरी भारतात भाषिक भेद ही वास्तवता अमान्य करता येत नाही. दक्षिणेतील राज्यात हिंदी भाषेला विरोध केला जात आहे. ही भूमिकाच मुळात राज्याधिष्ठीत आहे. 'हिंदी' ही भाषा भारतातील एकूण राज्याच्या संख्येपैकी सर्वाधिक राज्यात व्यवहारात बोलली व वापरली जाते. मात्र हिंदी या भाषेला राष्ट्रभाषेचा दर्जा मिळू नये म्हणून दक्षिणेतील राज्यांनी विरोध दर्शविला होता. मात्र असे असले तरीही हिंदी ही एक जानदार भाषा असल्याने तीला भारतात राष्ट्रभाषेचा दर्जा प्राप्त झाला आहे.

भारतातील प्रमुख वंशाअंतर्गत बोलल्या जाणा—या भाषा खालील प्रमाणे

१.इंडोआर्यन :—संस्कृत, हिंदी, मराठी, बंगाली, ओरीया,आसामी, कश्मिरी,नेपाळी, कोकणी,पंजाबी, उर्दू.

२.द्रविडीयन :—तेलगू,तमिल,कन्नडा,मल्याळम व तूलू.

३.मंगोलाईड :—मणिपूरी,त्रिपूरा, गारो आणि बोडो

४.आदिवासी भाषा आणि पोटभाषा :— गोंड, ओरायन, सन्थांल, मुंदारी व इत्यादी.

**संदर्भ :—**

१.आचार्य भगत सूर्यकांत, जातीभेद निर्मूलन, सुधीर प्रकाशन, वर्धा, २००५, पृ—३२.

२.पवार दया, डॉ. बाबासाहेब आंबेडकर गौरव ग्रंथ, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती, मंडळ, मुंबई, २००६,तृतीय आवृत्ती पृ—८९

३.मोहंती मनोरंजन, भारतीय लोकशाही अर्थ आणि व्यवहार, डायमंड पब्लिकेशन्स,पुणे, प्रथम आवृत्ती, २०१० पृ—११०.

४.भोळे भा.ल., भारताचे स्वातंत्र्य पन्नास वर्षाचा मागोवा, साकेत प्रकाशन, औरंगाबाद पृ—५४

**21**

# धर्म व जातीचा भारतीय राजकारणावर पडलेला प्रभाव

प्रा.डॉ.राहुल पंडित,
राज्यशास्त्र विभागप्रमुख,
श्री शिवछत्रपती महाविद्यालय, जुन्नर जि. पुणे

**********

**प्रस्तावना:—**

भारतीय राजकीय व्यवस्था प्रारंभिक काळापासूनच अनेक समस्यांचा सामना करीत इथपर्यंत मार्गक्रमण करीत आली आहे. प्रारंभिक काळापासूनच जात, धर्म, भाषावाद, प्रांतवाद, सांस्कृतीक भिन्नता या व नंतर दहशतवाद, नक्षलवाद, भ्रष्टाचार, बेरोजगारी, दारिद्रय रेषेचे प्रमाण हया व अन्य समस्या आ वासून उभ्या राहिल्या आहेत. या समस्यांचा परीणाम भारतातील मानवी जिवनाच्या सामाजिक, राजकीय, आर्थिक, शैक्षणिक, व्यापार, सहकार या व अन्य क्षेत्रावर पडलेला पाहावयास मिळतो. वरील समस्या हया परिस्थितीला अनुसरुन या व्यवस्थेवर परीणाम पाडत आल्या आहेत. सध्या भारतीय राजकारणावर वरील पैकी धर्म व जात या घटकांचा मोठ्या प्रमाणात प्रभाव पडलेला आहे.

भारतीय राज्यघटनेतील समता, स्वातंत्र्य, बंधुत्व आणि न्याय या तत्वाला अनुसरुन धर्मनिरपेक्ष व समताधिष्ठित मुल्यांना महत्व दिले असले तरी, प्रत्यक्षात पुर्वीपासून अभिजन असणारे व काही राजकीय पक्ष सत्ता प्राप्त करण्याच्या मोहापायी ही मुल्य पायदळी तुडवीत असतांना दिसतात. धार्मिक व जातीय राजकारणाने अत्यंत खालची पातळी गाठली आहे. रजनी कोठारी म्हणतात त्याप्रमाणे, पुर्वि राजकीय संस्था हया जाती संस्थाना आपल्याकडे आकर्षित करीत असत परंतू आता उलट जाती संस्था हया राजकीय संस्थाना आपल्याकडे आकर्षित करीत आहेत. एका अर्थाने आज धार्मिक तसेच जातीय राजकारण एकमेकांना परस्परपुरक भूमिका घेतांना दिसतात. लोकशाही



Scanned by CamScanner

मध्ये मताला अनन्य साधारण महत्व असते परंतू धार्मिक व जातीय राजकारणातून पुढे जातांना मतदार आपले अमुल्य मत अयोग्य उमेदवाराला देतात किंवा कवडीमोल किमतीत विकतात. मत विकणे एका अर्थाने लोकशाहीचा गळा घोटण्याचे काम मतदार वर्ग करु लागला आहे. सध्या काही राजकीय पक्ष हे जातीय, धार्मिक उद्देश साध्य करण्याच्या हेतूने पुढे आलेले दिसतात. आपले निश्चित हेतू साध्य करण्यासाठी सध्या प्रत्येक धार्मिक व जातीचे संघटन तयार होवू लागले आहे. संघटीत जाती हया दबावगटाचे तंत्र वापरुन शासनावर दबाव टाकुन आपल्या मागण्या पुर्ण करुन घेत आहेत. अल्पसंख्याक जात समुहाबरोबरच संख्येने जास्त व सत्ताधारी जातीसुद्धा जातीय राजकारण करीत असतांना दिसत आहेत.

भारतीय राजकारणावर व पर्यायाने एकुणच विकासावर धर्म, जात व अन्य घटकांचा इतका खोलवर प्रभाव का पडलेला आहे हे पाहत असतांना आपण मागे वळुन पाहिले तर त्याचा उलगडा होण्यास मदत होते. प्राचीन काळापासून भारतात चातुवर्ण्य व्यवस्थेनुसार वर्णव्यवस्था किंवा जातीव्यवस्थेची मुळे खोलवर रुजलेली आहेत. सामाजिक व्यवस्था ही वर्णावर आधारित होती. ते वर्ण ब्रम्हण, क्षत्रिय, वैश्य, शुद्र व अतीशुद्र (पंचम/अस्पृश्य) असे होते. मनुस्मृतिद्वारे वर्ण– जातीव्यवस्थेचे संहितीकरण केलेले होते. ब्रम्हणाने विद्या संपादन करणे, क्षत्रियाने रक्षणाचे काम करणे, वैश्याने व्यापार करणे व शुद्र आणि अतीशुद्राने वरील तीन वर्गाची सेवा करणे, अशी कार्य त्या वर्णात वाटप केलेली होती. धर्माला, धर्मशास्त्राला अग्रस्थानी ठेवले होते. रुढी, परंपरेला श्रेष्ठ दर्जा होता. हिंदु समाजाची मुळ रचनाच वर्ण, धर्म व जातीवर आधारित होती. वर्ण व्यवस्थेनुसार शुद्रातीशुद्रावर अस्पृश्यता लादली होती. अस्पृश्यता ही भारतीय समाजाला लागलेली किड होती. सामाजिक विषमतेमुळे माणुस असूनही शुद्रातीशुद्रांना अत्यंत हालाखीचे जीवन जगावे लागत होते. त्यांना सामाजिक, शैक्षणिक, राजकीय हक्कापासून वंचित ठेवले होते. यातून एक वर्ग दुस—या वर्गाला किती खालची वागणुक देऊ शकतो, याचे एक भेसूर चित्र म्हणजे अस्पृश्यता होय.

पारंपारिक पद्धतीनुसार प्राचिनकालीन कालखंडात अस्पृश्यतेच्या भयानक गुलामगिरीत कोटयावधी जीव खितपत पडले होते. अस्पृश्यतेच्या आगीत होरपळून अस्पृश्य माणूस जिवंत असून मृतवत झाला होता. गुलामगिरीमुळे अस्पृश्य वर्ग सामाजिक दृष्टया हीन बनला होता. राजकीयदृष्टया वरिष्ठांचा सेवक, चाकर बनला आणि शिक्षण व संस्कृती पासून तो कायमचा दुर फेकला गेला होता. हिंदु समाजव्यवस्थेत अस्पृश्यांचा स्पृश्यांना स्पर्श होणे विटाळ मानले जायचे. कुत्र्यामांजराचा किंवा पशूंचा स्पर्श त्यांना चालत असे. पण अस्पृश्यांची सावली जरी स्पर्शाच्या अंगावर पडली तरी ते विटाळच होत असे. एकूणच अस्पृश्यतेचे भयानक स्वरुप, देशव्यापीपणा आणि तिने घेतलेल्या मानव्याचा बळी हे अस्पृश्यतेचे हिडीस स्वरुप या सामाजिक व्यवस्थेत होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, जोपर्यंत सामाजिक सुधारणा होणार नाही तोपर्यंत राजकीय सुधारणेस महत्व नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे हे मत त्याकाळात असलेल्या विषम सामाजिक व्यवस्थेचा दाखला होय. समाजामध्ये सामाजिक विषमता राजकीय विषमतेत परावर्तीत झाली होती.

परंपरेनुसार अस्पृश्यांना वगळून उर्वरित चार वर्गाकडे अर्थाजनाची संपूर्ण साधणे होती. अस्पृश्यांना अर्थाजनासाठी वरील चार वर्गावर अवलंबून रहावे लागत असे. खेडयातील बलुता पद्धती किंवा तत्सम अर्थयंत्रणा ही खेडयातील आर्थिक, सामाजिक व राजकीय जनतेच्या दैनंदिन जीवनावर नियंत्रण ठेवत असे. खेडयात बलुता पद्धती प्रमाणे प्रत्येक जातीचा स्वतंत्र असा व्यवसाय ठरवून दिला होता. तो परंपरा, जन्म व जात यावर आधारलेला होता. प्रत्येक जातीने तिचाच धंदा केला पाहिजे, असा रुढीबध्द दंडक होता. खेडयात जातीवरुन धंदा व धंद्यावरुन जात आणि मनुष्य ओळखला जात असे. खालच्या जातीचे धंदे हीन असून त्यांचा दर्जा हीन मानला जात असे. त्यातच खेडयात अस्पृश्य वर्ग प्रायः भूमिहीन असल्याने त्यांचे आर्थिक जीवन परावलंबी होते. वरिष्ठ वर्गासाठी अनिच्छेतून कनिष्ठ, हीन दर्जाची कामे करावी लागत असत. वर्षानुवर्षे अस्पृश्यांना अपमानांचे, उपेक्षितांचे जीवन जगावे लागत असे.या प्रकारची सामाजिक, राजकीय , सांस्कृतीक व आर्थिक परिस्थिती ही धर्म व जातीशी निगडित होती. एकुनच



Scanned by CamScanner

व्यवस्था ही धर्म व जातीवर आधारीत होती. वर्चस्व प्रस्थापित करण्यातून वरिष्ठ वर्णांनी समाजव्यवस्था जाती व उपजातीत विभागली. व बहुजन समाजाला जातीत गुरफटून ठेवले. वरील विषमतेवर आधारीतधार्मिक व जातीय घटकाला महत्व देणा—या सामाजिक व्यवस्थेच्याविरोधात समाज सुधारकांनी व संतांनी आवाज उठविल्या नंतर हळुहळु वरील परिस्थिती बदलत गेली. स्वातंत्र्यानंतर भारताने आपले संविधान तयार केले. संविधान निर्माते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी वरील विषमतेवर आधारीत धार्मिक व जातीय घटकाला महत्व देणा—या सामाजिक व्यवस्थेला संपुर्ण बदलून समता, स्वातंत्र्य, बंधुत्व आणि न्याय या तत्वाला अनुसरुन ध र्मनिरपेक्ष व समताधिष्ठित मुल्यांना महत्व देणारी सामाजिक व्यवस्था निर्माण करणारी तत्वे राज्यघटनेत समाविष्ठ केली. त्यानुसार अमुलाग्र परीवर्तनही झाले. परंतू कमी अधिक प्रमाणात धार्मिक व जातीय घटकाला महत्व देणारे राजकारण काही लोकांकडून सुरवातीपासूनच होत राहीले आहे. सामाजिक व्यवस्था निर्माण करणारी तत्वे राज्यघटनेत समाविष्ठ केली. त्यानुसार अमुलाग्र परीवर्तनही झाले. परंतू कमी अधिक प्रमाणात धार्मिक व जातीय घटकाला महत्व देणारे राजकारण काही लोकांकडून सुरवातीपासूनच होत राहीले आहे. राजेश्वरी देशपांडे म्हणतात, गेल्या काही वर्षात महाराष्ट्रात जाती—जातीचे संघटन ठळकपणे समोर येत आहे. ब्राम्हण—मराठ्यांसह अनेक लहान—मोठे जाति समुह आपल राजकीय अस्तित्व अधोरेखित करु पाहत आहे. त्यासाठी जातिंच्या अस्मितांचा आधार घेत आहेत. आपलं राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक आत्मभान व्यक्त करण्यासाठी या समुहांना जातीकडे का वळावं लागत आहे?

**निष्कर्ष:—**

स्वातंत्र्यापासून भारताचा सामाजिक, राजकीय, आर्थिक, शैक्षणिक, व्यापार, सहकार या क्षेत्रात होत असणा—या विकासाचा आलेख पाहिला तर प्रगतशिल वाटतो पण हा विकास ज्या गतीने होणे अपेक्षित आहे तसा नाही. निश्चितपणे धार्मिक व जातीय घटकांचा भारतीय राजकारणावर प्रभाव जाणवतो. भारताचा योग्य प्रमाणात विकास करावयाचा असेल तर जात व धर्म यांना दुर ठेवून भारतीय राज्यघटनेतील तत्वांना अनुसरुन प्रत्येक एका भारतीयाने आपले आचरण ठेवणे गरजेचे आहे. याशिवाय दुसरा अन्य पर्याय नाही.

**संदर्भ:—**


१.गायकवाड प्रदिप(संपादक), (२०१४), कामगार चळवळ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची निवडक भाषणे व लेख, समता प्रकाशन, नागपूर.

२.खरात शंकरराव, (२००१),अस्पृश्यांचा मुक्तीसंग्राम. इंद्रायणी साहित्य प्रकाशन, पुणे.

३.कीर धनंजय, (२००६), डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई .

४.डॉ. गायकवाड ज्ञानराज काशीनाथ,(२००६), डॉ. भीमराव रामजी आंबेडकर,राजवंश पब्लीकेशन.

५.http://uniquefeatures.in/anubhav May 2010


❑❑❑



Scanned by CamScanner